# Possitive Stories

गडचिरोली दि. २७/०५/२०१७

# पोलीसांनी घडवले माणुसकीचे दर्शन

- **परीसरातील पाळीव जनावरांसाठी बांधला पाण्याचा हौद**

जिल्हयातील एप्रिल - मे चा तीव्र उन्हाळा. जंगलातील सर्व तळी, पाणवठे कोरडी पडलेली. जिथे नागरीकांनाही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते तिथे जनावरांचे काय हाल? भामरागड तालुक्यातील दुर्गम अशा ताडगाव मदत केंद्रामध्ये कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचारी व ९ बटालियन सीआरपीएफचे जवानांनी जंगलात चरण्यासाठी जाणाऱ्या व पाण्यासाठी वणवण भटकंती करणाऱ्या जनावरांसाठी पोमकेच्या आवारात एक सिमेंटचा हौद तयार केला असुन तो २४ तास खुला केला आहे. या पाणवठयामध्ये पोलीस मदत केंद्रातील कर्मचारी हे पाणी भरुन ठेवतात. या पाणठयावर परिसरातील पाळीव जनावरे दररोज पाणी पिण्यासाठी येतात. त्याचबरोबर जंगलातील हरीण, कोल्हा यासारखे प्राणी देखील कधी मधी पाण्यासाठी येतात.

पाण्यासाठी भटकणाऱ्या जनावरांची तहान भागवून एका आगळया वेगळया माणूसकीचे दर्शन पोलीसांनी ताडगाव येथे घडविले आहे. अशा हया उल्लेखनीय कामाबद्दल पोलीसांवर नागरीकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

